# कार्यकारी अभियंता – रस्ते

**कार्यकारी अभियंता रस्ते विभागाची प्रस्तावना** :- उप अभियंता झोन 1 ते 10 आणि उप अभियंता शासन अनुदान प्रकल्प या उप विभागामार्फत केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या रस्त्यांच्या कामांची कार्यकारी अभियंता म्हणून उप विभागांकडून कार्यान्वयन करणे,उप विभागांकडून प्राप्त अंदाजपत्रक संचिका,निविदा संचिका व इतर सर्व संचिका वरिष्ठांकडे मान्यतेसाठी पाठविणे.प्रगतीपथावर असलेल्या कामांचा, प्रकल्पांचा वेळोवेळी आढावा घेऊन दर्जा व गुणवत्तेबाबत आवश्यक सूचना करणे.पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी रस्त्यालगत स्टॉर्म वॉटर ड्रेन तयार करून घेणे, शहरातील नागरीकांना चांगले रस्ते उपलब्ध करून देणे.खड्डेमुक्त रस्ते असावेत यासाठी पॉटहोल बुजवून घेणे,त्यासाठी आवश्यकतेनुसार पॅचवर्क करवून घेणे. शहर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने प्रमुख चौकात सुबक वाहतूक बेटे उभारणे.नागरीकांच्या सुरक्षित व सुखकर प्रवासासाठी प्रमुख रस्त्यांवर आवश्यकतेनुसार पादचारी पथ, दुभाजक,झेब्रा क्रॉसिंग,दिशादर्शक फलक लावण्याची कार्यवाही संबंधित उप विभागाकडून करवून घेणे.जेणेकरून शहरातील दळणवळण सुयोग्य पद्धतीने होत राहील यासाठी प्रयत्न करणे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **उद्यानांसाठी** आरक्षीत खुल्या जागांवर नवीन उद्यान विकसीत करण्याची कामे करण्यात येतात. नुकतेच सि.स.नं. 53/पी, गारखेडा येथे नवीन उद्यान विकसीत करण्याचे काम पुर्ण केले असून, त्याचे लोकार्पण करण्यात आले आहे.तसेच सातारा देवळाई भागातील गट क्र. १६८ (भाग) मौजे सातारा, गट नं. 144 मौजे सातारा आणि गट नं. ९१ व ९२ (भाग) मौजे सातारा या तिन ठिकाणच्या खुल्या जागांवर नवीन उद्यान विकसीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

आस्तित्वातील उद्यानांतील पाथवे, गेट, गजिबो, खेळण्या, बेंचेस, रंगरंगोटी इत्यादीसह स्थापत्य व विद्युत विषयक कामांची देखभाल व दुरुस्ती आवश्यकतेनुसार त्या-त्या वेळी केली जाते. शिवाय शासनाचे वेळोवेळी प्राप्त निर्देशाची अंमलबजावणी करणे, प्राप्त शासन निधी अंतर्गत कामे करणे इत्यादी कार्यवाही उद्यान विभागाकडून केली जाते.

# ०१ अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य - नाव , कामाचे स्वरुप व संपर्क क्रमांक

| अ.क्र | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | कामाचे स्वरुप | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| 01 | **श्री संजय कोंबडे कार्यकारी अभियंता (प्र .)** | ➢ मा.वरिष्ठांच्या निर्देशानुसार मा.स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी सुचविलेल्या रस्त्यांच्या कामांची यादी अंतिम करणे व महानगरपालिकेतर्फे नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व संबंधीत वार्ड अभियंता यांच्या समन्वयाने रस्त्यांचे प्राथमिक सर्वेक्षण करून विस्तृत/संक्षिप्त प्रकल्प अहवाल तयार करणे व शासन स्तरावर निधी मागणी करणेकरीता प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव तयार करून शासनास सादर करणे.<br>➢ मंजुर शासन निधीच्या मर्यादेत प्रामुख्याने करावयाच्या रस्त्यांच्या कामांची पॅकेजनिहाय निविदा पुर्व व निविदा पश्चात कामे करणे.<br>➢ उक्त नमूद कामे प्रकल्पीय स्वरुपाची असल्यामुळे महानगरपालिकेतर्फे नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या समन्वयाने संबंधीत कंत्राटदारा मार्फत दर्जा व गुणवत्ता राखून करून घेणे.<br>➢ उक्त नमूद कामाच्या अनुषंगाने शासनास करावयाचा पत्र व्यवहार, कार्यालयीन पत्र व्यवहार, माहिती अधिकार अंतर्गत पत्र व्यवहार व तदनुषंगाने मा.वरिष्ठांनी निर्देशित केल्यानुसार कार्यालयीन कामे करणे.<br>➢ मा.वरिष्ठांच्या निर्देशानुसार महानगरपालिका व इतर शासकीय कार्यालयात संपन्न होणा-या बैठकीस उपस्थित राहणे. | ९७६४९९९४४१ |
| 02 | **श्री प्रवीण कुलकर्णी अधीक्षक** | ➢ छत्रपती संभाजी नगर शहरातील झोन कार्यालया अंतर्गत होणाऱ्या रस्ते विकास कामाबाबतच्या संचिकांची प्राथमिक तपासणी करून वरिष्ठांकडे सादर करणे. . | 7776032873 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ➢ रस्त्यांच्या विकास कामाबाबत वेळोवेळी होणाऱ्या प्रगती अहवालाबाबत समन्वय ठेवून माहिती वरिष्ठांना सादर करणे | |
| 03 | **श्री विजय हिवाराळे लिपिक** | ➢ कार्यालयीन टपाल घेणे, कार्यालयीन टपालाची आवक जावक नोंदी ठेवणे,संचिका हाताळणे , संगणकीय सर्व कामे करणे व वरीष्ठानी आदेशीत केलेले कामे करणे, | 7350204026 |

## ४ विभागातील कार्यवाही अंतर्गत प्रकल्प

| | |
|---|---|
| 1. | शहरातील उपअभियंता झोन क्रमांक 01 ते 10 व उपअभियंता शासन अनुदान प्रकल्प या विभागांतर्गत चालू असलेली सर्व प्रकल्प रस्त्यांची कामे. |
| | |

## ५. विभागातील पुर्ण झालेले प्रकल्प

| | |
|---|---|
| 1. | शहरातील उपअभियंता झोन क्रमांक 01 ते 10 व उपअभियंता शासन अनुदान प्रकल्प या विभागांतर्गत चालू असलेली सर्व प्रकल्प रस्त्यांची कामे.. |

## ६. विभागातील प्रस्तावित प्रकल्प

| | |
|---|---|
| 1. | शहरातील उपअभियंता झोन क्रमांक 01 ते 10 व उपअभियंता शासन अनुदान प्रकल्प या विभागांतर्गत चालू असलेली सर्व प्रकल्प रस्त्यांची कामे.. |